# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ,गोवर्धन, नाशिक- 422 222


जा.क्र. यचममुवि/कुका/2020/Q102 दि. 26/03/2020

## परिपत्रक

संदर्भ -1) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. No.DMU/2020/CR92/DisM-1, दि. 25.03.2020
2) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र. 1-14/2020 (website) दि. 21.03.2020
3) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. यचममुवि/कुका/2020/Q101 दि. 22.03.2020.

संदर्भांकित पत्र क्र. 1 नुसार कोरोना विषाणू चा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने राज्यात दि. १४ एप्रिल २०२० पर्यंत 'लॉकडाऊन' घोषित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने-

1. विद्यापीठ, राज्यातील सर्व विभागीय केंद्रे, सर्व अभ्यासकेंद्रे दि. १४ एप्रिल २०२० पर्यंत बंद करण्यात येत आहे.
2. वरील बंद मधून सेवासुविधा, अभियांत्रिकी कक्षांतर्गत येणाऱ्या अत्यावश्यक सेवा- स्वच्छता, सुरक्षा, पाणी पुरवठा, विद्युत ई. वगळण्यात येत आहेत. सदर सेवांकरीता आवश्यकतेनुसार कमीत कमी मनुष्यबळ वापरण्यात यावे. कृषी विज्ञान केंद्रांतर्गत आवश्यक कार्ये करण्याकरिता न्यूनतम मनुष्यबळाचा उपयोग करावा.
3. शिक्षकांकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भांकित पत्र क्र. 2 नुसार **Work from Home** बाबत निर्देश दिलेले आहेत, त्याचा अवलंब करावा.
4. वित्त विभागाने पगार देयके व इतर आवश्यक वित्तविषयक कामे संगणकीय प्रणालीचा उपयोग करून घरून करावी व आवश्यक असेल तेंव्हा न्युनतम अधिकारी/कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यास कळवावे.
5. विद्यापीठातील विशेषत: नोंदणी, परीक्षा विभागाने तसेच शक्य असेल तिथे इतर विभागांनी नियोजीत कामे घरून ऑनलाईन पध्दतीचा वापर करून घरून पूर्ण करावीत.
6. अत्यावश्यक सेवांच्या अनुषंगाने कार्यरत सर्वांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या दिशा निर्देशांचे (advisory) पालन करावे.

या परीपत्रा व्यतिरिक्त शासनाने तसेच संबंधित जिल्हा प्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.

(डॉ. दिनेश भोंडे)
कुलसचिव

प्रत: १) मा. कुलगुरू कार्यालय २) विद्यापीठातील सर्व विद्याशाखा तसेच प्रशासकीय विभाग ३) सर्व विभागीय केंद्र ४) विद्यापीठ संकेत स्थळ

Scanned with CamScanner